पाणी टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या तात्पुरत्या पूरक नळ योजना व नळ योजनेची विशेष दुरुस्ती या उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी सर्वसाधारण सूचना.

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र. टंचाई १००६/प्र.क्र.१०६ /पापु १४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- १६ मे, २००६.**

**वाचा :-** १) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई १०९९/प्र.क्र.१२/पापु१४ दि.३ फेब्रुवारी १९९९

**परिपत्रक :-**

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ संदर्भाधीन स्थायी आदेशानुसार घेण्यात येणा-या उपाययोजनांपैकी तात्पुरत्या पूरक नळ योजना व नळ योजनांची विशेष दुरुस्ती या उपाययोजना मोठ्या प्रमाणावर घेतल्या जात असल्याचे दिसून आले आहे. योजनांचे मंजूरी आदेश वेळीच निर्गमित न झाल्याने, उपाययोजनांवर मोठ्या प्रमाणावर खर्च होऊन देखील योजना कार्यान्वित होऊन प्रत्यक्ष उन्हाळ्यात संबंधित लोकांना त्यांचा लाभ होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या उपाययोजना घेताना होणारी अनियमितता व निधीचा सुयोग्य उपयोग होण्याच्या दृष्टीने या उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

(१) प्रत्येक गावात सुरुवातीपासून घेण्यात आलेल्या सर्व टंचाई निवारक उपाययोजनांची विस्तृत माहिती, संकल्पचित्र व विवरण याची सर्वंकष माहिती ग्रामपंचायतीमध्ये असावी. या माहितीची एक प्रत पंचायत समितीमध्ये देखील असावी. कोणत्याही गावात नवीन योजना हाती घेण्यापूर्वी उपलब्ध माहितीचा अभ्यास करुन पूर्वी घेण्यात आलेल्या योजनांच्या साहित्याचा वापर करुन नवीन योजनेची आखणी कशी करता येईल याचे विवरण देणे आवश्यक आहे.

(२) पूर्णपणे निरुपयोगी झालेल्या योजनांची विल्हेवाट वेळच्या वेळी लावावी आणि त्यातून मिळणारी रक्कम जिल्हा पाणी पुरवठा निधीमध्ये जमा करावी.

(३) टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणा-या तात्पुरत्या पूरक नळ योजनांची अंदाजपत्रके व आराखडे मोका पाहणीवर आधारित व प्रत्यक्ष भूस्तर तपासणी करुन तयार करावीत. अंदाजपत्रके व आराखडे वस्तुनिष्ठ असावेत. तसेच, पूर्वीच्या योजनेच्या साधनसामुग्रीचा योग्य तो वापर करण्यात यावा.

(४) योजनेसाठी निविदा प्रक्रिया, साहित्याची उपलब्धता इ.सर्व बाबी लक्षात घेऊन, योजना प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यासाठी लागणारा कालावधी स्पष्टपणे नमूद करण्यात यावा. योजना कार्यान्वित होण्यास लागणारा कालावधी मोठा असल्यास व प्रत्यक्षात उन्हाळ्यात योजनेचा फायदा होणार नसेल तर अशा योजनांना पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत मंजूरी देण्यात येऊ नये.

(५) शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत अनावश्यक कामे वारंवार घेतली जातात आणि त्यापेक्षा कमी खर्चाच्या उपाययोजनांची दखल घेतली जात नाही. तसेच योजना वेळेवर पूर्ण करणे आणि पूर्ण केल्यानंतर त्याचा लाभ जनतेस लगेच मिळावा याकडे लक्ष दिले जात नाही. तरी याबाबत दक्षता घेण्या त यावी.

(६) तात्पुरत्या पूरक नळ योजनांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांची सर्वंकष तपासणी करुन योजना व्यवहार्य असल्याची खात्री झाल्यास मंजूरीचे आदेश १५ दिवसात निर्गमित करावेत व मंजूरी आदेशाची एक प्रत शासनास सादर करावी.

(७) तात्पुरत्या पूरक नळ योजना व नळ योजना विशेष दुरुस्तीचे मंजूरी आदेश निर्गमित केल्यानंतर, मंजूर कामे जास्तीत जास्त १ महिन्याच्या आत पूर्ण होतील हे कटाक्षाने पहावे. मंजूरी आदेश निर्गमित केल्यानंतर ५० टक्के अनुदान वितरीत करावे व प्रत्यक्षात योजना पूर्ण होऊन पाणी पुरवठा सुरु झाल्याबाबत संबंधित ग्रामपंचायतीचा दाखला प्राप्त झाल्यानंतरच उर्वरित ५० टक्के अनुदान वितरित करण्यात यावे.

(८) विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणा-या तात्पुरत्या पूरक नळ योजनांचे व नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव हे टंचाई निवारणार्थ इतर उपाय योजना घेण्यापेक्षा व्यवहार्य ठरत असतील तरच योग्य शिफारशीसह शासन स्तरावर विशेष बाब म्हणून मंजूरीसाठी तातडीने सादर करावेत. याबाबत असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद स्तरावरुन जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांमार्फत प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होण्यास २-३ महिन्याचा कालावधी लागतो. परिणामी योजना प्रत्यक्षात वेळीच कार्यान्वित न झाल्याने पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्याचा हेतू सफल होत नाही. पाणी टंचाई ही अत्यंत संवेदनशील बाब असल्याने, प्राप्त प्रस्ताव कोणत्याही स्तरावर आठ दिवसापेक्षा जास्त दिवस प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता संबंधित कार्यालयाने घ्यावी.

(९) तात्पुरत्या पूरक नळ योजना व नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीच्या योजनांना दिनांक १५ एप्रिल पूर्वी मंजूरी देण्यात यावी. जेणेकरुन एक महिन्याच्या आत कामे पूर्ण होऊन प्रत्यक्ष उन्हाळ्यात योजनांचा लाभ जनतेला मिळू शकेल.

(१०) राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार, नळ योजनांची देखभाल व दुरुस्ती संबंधित लाभार्थ्यांनीच करावयाची आहे. राज्य शासनाने नळ योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध करुन देण्यात येणा-या निधीत दरवर्षी २०% याप्रमाणे कपात केली आहे. परिणामी टंचाई कार्यक्रमांतर्गत नळ योजनाच्या विशेष दुरुस्तीची कामे घेण्याचे प्रमाण वाढीस लागल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सरसकट नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीची कामे टंचाई कार्यक्रमांतर्गत घेण्यात येऊ नयेत. नळ योजनेची विशेष दुरुस्ती ग्रामपंचायतीस/ जिल्हा परिषदेस त्यांच्या उपलब्ध निधीतून करणे शक्य नसेल व नळ योजना विशेष दुरुस्ती केल्यामुळे त्या गावाची पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होईल याची जिल्हाधिकारी यांची खात्री असेल व ती किमान खर्चाची उपाययोजना असेल तर अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा. जेणेकरुन, नळ योजनेच्या विशेष दुरुस्तीची कामे वेळीच पूर्ण होऊन प्रत्यक्ष उन्हाळयात योजनेतून लाभार्थ्यांना पाणी उपलब्ध होऊ शकेल.

वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन शासकीय निधीचा सुयोग्य उपयोग होईल, याबाबत क्षेत्रीय अधिका-यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(भि. ना. पतिंगे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद (सर्व)
पापु-१४ संग्रहासाठी

E:\CR 106- 06 Purak Nal Yojana, Nal Yojanechi vishesh Durusti.doc